# विद्यापीठात ५० टक्के कर्मचारी उपस्थित

## अंमलबजावणी सुरु : सर्व अधिविभाग बंदच असल्याने शुकशुकाटात भर; रोटेशननुसार कामावर येण्याच्या सूचना

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठातील प्रशासकीय आणि अधिविभागांतील काम शुक्रवारपासून सुरु झाले. वर्ग भरत नसल्याने विद्यार्थ्यांची उपस्थिती नाही. त्यातच ५० टक्के कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीच्या निर्णयाची अंमलबजावणी सुरु झाल्याने विद्यापीठ परिसरातील शुकशुकाटामध्ये अधिकच भर पडली आहे.

कोरोनाबाबत दक्षता म्हणून राज्य सरकारने सर्व शासकीय कार्यालयांतील गर्दी कमी करण्यासाठी ५० टक्के कर्मचारी उपस्थित ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्याची अंमलबजावणी विद्यापीठात शुक्रवारपासून सुरु झाली.



**'कोरोना'च्या पार्श्वभूमीवर ५० टक्के कर्मचारी उपस्थितीच्या निर्णयाची शिवाजी विद्यापीठात शुक्रवारपासून अंमलबजावणी सुरु झाली. त्यामुळे दूरशिक्षण केंद्राच्या कार्यालयात असा शुकशुकाट दिसून आला.**

विद्यापीठातील विविध अधिविभागांतील तातडीचे आणि महत्त्वाचे काम चालू राहण्याच्या दृष्टीने संबंधित अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, चीफ रेक्टर, प्रशासकीय विभागप्रमुखांकडून सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना रोटेशननुसार कामावर येण्याच्या सूचना केल्या. अत्यावश्यक सेवेकडील एकत्रित मानधन, रोजंदारी कर्मचारी उपस्थित राहिले.

ज्यांना येणे शक्य नव्हते, त्यांनी त्याबाबत आपापल्या विभागप्रमुखांना कळविले. ५० टक्के उपस्थितीबाबतचे परिपत्रक विद्यापीठाने गुरुवारी (दि. १९) सायंकाळी काढले.

त्यावर काही विभागप्रमुखांनी त्याची माहिती कर्मचाऱ्यांना व्हॉट्स ॲपद्वारे दिली. मात्र, ज्यांना माहिती मिळाली नाही, असे बहुतांशजण कामावर उपस्थित राहिले. त्यामुळे साधारणत: ७० टक्के कर्मचारी उपस्थित होते. आज, शनिवारपासून कर्मचारी उपस्थितीची संख्या आणखी कमी होईल.

दरम्यान, विद्यापीठ परिसर म्हणजे कायम वर्दळ असे चित्र प्रथमच कोरोनामुळे बदलल्याचे दिसत आहे.

### 'मार्च एंड'चा परिणाम

वित्त व लेखा विभागांसह विविध विभागांमध्ये मार्च एंडचे काम सध्या सुरु आहे. ते पूर्ण करणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे कामाच्या गरजेनुसार कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार संबंधित विभागांच्या उपकुलसचिवांना आहेत. काम पूर्णत: ठप्प होणार नाही, याची दक्षता घेऊन उपकुलसचिव कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबतची कार्यवाही करीत आहेत.

### अधिकारी, कर्मचाऱ्यांची आकडेवारी दृष्टिक्षेपात

- वर्ग एक (उपकुलसचिव, सहाय्यक कुलसचिव) : ३९
- वर्ग दोन (पर्यवेक्षक) : ३०
- वर्ग तीन (वरिष्ठ आणि कनिष्ठ लिपिक) : २६५
- वर्ग चार (शिपाई) : १६५

# कामकाज ऑनलाइन

कोल्हापूर : करोनाचा संसर्ग रोखण्यासाठी शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने ऑनलाइन कामकाज सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Exam या लिंकवर सर्व प्रकारचे अर्ज डाऊनलोड करून घेता येणार आहेत. या अर्जांमधील माहिती भरून अर्ज स्कॅन करून वेबसाइटवरील मेलवर पाठवावा लागणार आहे. संबंधित अर्जांचे शुल्क डीडीद्वारे विद्यार्थ्यांना भरावे लागेल.



**कोल्हापूर : कुलसचिव डॉ. नांदवडेकर, प्रशिक्षक बाजीराव पाटील व अन्य मान्यवरांसोबत अक्षय मंगवडे.**

# अक्षय मंगवडेचा सत्कार

**पुनाळ :** कोतोली येथील श्रीपतराव चौगुले आर्टस ॲण्ड सायन्स कॉलेजचा विद्यार्थी अक्षय मंगवडेने कुस्तीत रौप्यपदक मिळवले. अक्षयने भुवनेश्वर (ओरिसा) येथे झालेल्या खेलो इंडिया कुस्ती स्पर्धेत १२५ किलो वजनी गटात रौप्यपदक प्राप्त केले. तो बी.ए. भाग एकमध्ये शिकतो. शिवाजी विद्यापीठात कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिमखानाप्रमुख प्रा. यु. एन. लाड, वित्त व लेखाधिकारी पाटील, क्रीडा विभागप्रमुख डॉ. गायकवाड, कुस्ती प्रशिक्षक प्रा. बाजीराव पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.